INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# महाराष्ट्रातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या आणि उपाय

**धर्मराज माणिकराव जाधव**
**अर्थशास्त्र विभाग**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
E-mail: **jadhavdharmaraj5560@gmail.com**

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/07.2021-59468874/IRJHIS2107029**

**प्रस्तावना-**

शेतीला जोड धंदा म्हणून खूप पुर्वी पासून दुग्ध व्यवसाय केला जातो. मात्र आधूनिक शेती पध्दतीत दूग्ध व्यवसायाकडे धंदा म्हणून बघीतल्या जायला लागले. भारतात दूग्ध व्यवसायात महाराष्ट्र ७ व्या क्रंमाकाचे राज्य आहे. दूग्ध व्यवसायातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मीती झाली आहे.महाराष्ट्रातून दूध संघा मार्फत दुध संकलन करुन त्यावर प्रक्रिया केली जाते. आणि त्यानंतर ते दूध वितरण करण्यात येते. दूधाला व्यवसायाचे स्वरुप आल्यापासून त्यात जास्त नफा मिळवण्यासाठी व जास्त उत्पादन घेण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात येतात. त्या मध्ये जास्त दुध देणाऱ्या गाई व म्हशी चे रेतन करण्यात येते. यात गिर, साहिवाल, राठी, लाल सिंधी, थारपारकर, कांकरेज इत्यादी जातीच्या गाई, तर मुऱ्हा, पंढरपूरी, नागपूरी, मराठवाडी इत्यादी म्हशीच्या जातीचा वापर करण्यात येतो. या उच्च दूध देणाऱ्या गाईच्या व म्हशीच्या जाती आहे. ह्या व्यवसायीकांना अनेक समस्येला तोंड द्यावे लागत आहे. त्यात राज्य शासनाने दूधाला जास्त भाव देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र अतिरिक्त दूधामुळे ते शक्य होऊ शकले नाही. दूध भूकटीवर सूध्दा शासनाने काही महिन्यांसाठी ५० रु अनूदान दिले होते. केंद्र शासनाने दूग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी ''दूध व्यवसाय उद्योजक विकास योजना'' तसेच ''दूध महापूर'' योजना या सारख्या योजना मधून दूध उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतू हे उपाय पूरेसे ठरले नाही. त्यामुळे आपल्या समस्या दूग्ध उत्पादक शेतकऱ्यांनी वेळोवेळी आंदोलनाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. असेच एक राज्यव्यापी आंदोलन औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालूक्यातील लाखगंगा या गावात ४ मे २०१८ रोजी सूरु झाले होते. त्याचे पडसाद पूर्ण राज्यभर पडले होते. दूग्ध व्यवसायातील सर्वात मोठी समस्या ही दूधाला मिळणारा कमी भाव आहे. शेतकरी संघटनेने राहूरी विद्यापीठातल्या पशूविद्यान आणि दूग्ध शास्त्र विभागाच्या माप दंडानूसार एक लिटर दूधाचा खर्च काढला. त्यांच्या मते एक लिटर दूधाला शेतकऱ्याला ३४ रु खर्च येतो.

महाराष्ट्रातील दूग्ध व्यवसायात मोठ्या प्रमाणात भौगोलिक असमानता पाहावयास मिळते. पश्चिम महाराष्ट्रातील

कोल्हापूर, सांगली, सातारा, पूणे, अहमदनगर जिल्ह्यात दूग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे मुबलक प्रमाणात उपलब्ध असणारे पाणी. त्याप्रमाणात मराठवाडा व विदर्भात दूग्ध व्यवसाय कमी प्रमाणात फैलाव झाल्याचे जाणवते.

| **जिल्हा** | **दूध संकलनातील एकून टक्केवारी** |
|---|---|
| रायगड | २.०१ |
| रत्नागिरी | ०.९५ |
| सिंधुदुर्ग | ०.७० |
| जळगाव | ६.१० |
| अ.नगर | ९.२५ |
| पूणे | ९.२० |
| सातारा | ६.५९ |
| सांगली | ६.०५ |
| कोल्हापूर | ८.८३ |
| औरंगाबाद | २.७५ |
| जालना | १.३८ |
| बीड | २.७३ |
| अकोला | १.७० |
| अमरावती | १.५७ |
| यवतमाळ | १.३८ |

**स्त्रोत -** Animal husbandry satistics Maharashtra Report

या तक्त्यावरुन लक्षात येते की, महाराष्ट्रात दूध उत्पादन व व्यवसायात मोठ्या प्रमाणात तफावत जाणवते. महाराष्ट्रात अनेक नामांकित दूध संघ दूध संकलनाचे काम करतात. त्यात कोल्हापूर चे गोकूळ, कोपरगावचे राजहंस, औरंगाबादचे देवगिरी यांचा समावेश आहे मात्र त्यात सूसूत्रतेचा अभाव असल्याचे जाणवते. त्याचा तोटा शेतकऱ्यांना सहन करावा लागतो. आज ही महाराष्ट्रात उच्च दूध देणाऱ्या गाईची निर्मीती करणे आवश्यक आहे. आज दूधा पेक्षा पाणी महाग विकत असल्याचे विदारक चित्र महाराष्ट्रात पहायला मिळत आहे. त्यामुळे दूग्ध व्यवसायाच्या निर्माण झालेल्या समस्या चा शोध घेवून त्यावर उपाय शोधण्यासाठी विषयाची निवड करण्यात आली आहे.

**विषय निवडीचे महत्व -**

महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यात दूग्ध व्यवसायाने मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मीती केली आहे मात्र या व्यवसायाला आता ढिसाळ नियोजनामुळे उतरती कळा लागली आहे. हा समृध्द व्यवसाय आपली शेवटची घटका मोजत आहे. अनेक व्यवसायीकांनी यातून काढता पाय घेतला आहे. परंतू हा व्यवसाय पून्हा उभा राहणे गरजेचे आहे. त्यामुळे त्याच्या आर्थिक समस्या जाणून त्यावर उपाय योजण्यासाठी ह्या विषयाची निवड केली आहे.

**उद्दीष्टे -**

१) महाराष्ट्रातील दूग्ध व्यवसायाची पार्श्वभूमी अभ्यासणे.

२) महाराष्ट्रातील दूग्ध उत्पादकांच्या समस्या चा अभ्यास करणे.

३) दूग्ध व्यवसाय डबघाईस येण्यामागची कारणे शोधणे.

४) महाराष्ट्रातील दूग्ध उत्पादकांच्या समस्या वर उपाय सूचविणे.

**संशोधन पध्दती -**

महाराष्ट्रातील दूग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या जाणून घेण्यासाठी व त्यावर उपाय योजना करण्यासाठी खालील संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली आहे.

- महाराष्ट्रातील काही निवडक दूध संघाची वार्षीक तपासणी अहवालातून माहिती गोळा केली आहे.
- महाराष्ट्रातील प्रसिध्द वर्तमानपत्रे , नियतकालिके, शासनाच्या वेबसाईट, संबधीत संदर्भ पूस्तकांचा आधार घेतला आहे.

**महाराष्टातील दूध व्यवसाय -**

स्वातंत्र्यानंतर दूध संकलनाला व्यवसायाचे स्वरुप मिळाले. शेतकऱ्यांनी शेती सोबत जोड धंदा म्हणून दूग्ध व्यवसायाला पसंती देण्याचे काम केले. त्यातून त्यांना मोबदला मिळण्यास सूरवात झाली. त्यानंतर आधूनिकते मुळे दूध जास्त दिवस टिकवणे शक्य झाले. व त्यापासून वेगवेगळे पदार्थ निर्माण करण्यात येवू लागले. दूधाला व त्यापासून बनवलेल्या पदार्थाला मोठ्या प्रमाणात मागणी निर्माण झाली. व त्यांची एक स्वतंत्र बाजारपेठ उभी राहिली. वाढत्या मागणी सोबत लोकांचा या व्यवसायाकडे कल निर्माण झाला. आणि हा व्यवसाय भरभराटीस आला. त्यातून जास्त उत्पादन देण्याऱ्या गाई व म्हशीची पैदास निर्माण झाली. ह्या व्यवसायात महाराष्ट्र राज्य सूध्दा अग्रसर होते. महाराष्ट्रात दूधाला मोठी बाजारपेठ मिळाली व आधूनिकतेची जोड मिळाली. त्यातून शेतकऱ्यांचा या व्यवसायाकडे ओढा निर्माण झाला. आणि शासनाने त्यासाठी सर्वतोपरी मदत केली. जिल्ह्या जिल्ह्यात दूध संघाची स्थापना झाल्यानंतर दूधाला भाव मिळू लागला. तोपर्यंत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा या व्यवसायात जम बसला होता. मात्र त्यानंतर अतिरिक्त निर्माण झालेल्या दूधामुळे दूधाचे भाव घसरले. ते इतके घसरले की बाटली बंद पाणी सूध्दा त्यापेक्षा महाग विकू लागले. आणि खाद्याला मागणी वाढल्यामूळे या व्यवसायाकडे बघाण्याचा सरकारचा दृष्टिकोन सुध्दा उदासिन झाला. पावसाची अनियमितता यामुळे जनावरांना हिरवा चारा मिळणे कठीण झाले व विकत चारा परवडेणासा झाला. या सर्व समस्येमुळे हा व्यवसाय डबघाईस आला.

**दुग्ध व्यवसायांतील समस्येतील कारणे -**

१) दूधाला जास्त भाव न मिळणे.

२) चाऱ्यांचे वाढलेले भाव.

३) पशू खाद्यांचे वाढलेले भाव.

४) व्यवसायातील आधूनिकतेचा अभाव.

५) सरकारची उदासिनता.

६) दूध संघाची मनमानी कारभार व त्यातील राजकारण.

७) आधूनिक व राष्ट्रीय बाजारपेठेचा अभाव.

८) उच्च जातीच्या गाई व म्हशीची वणवा.

९) विज, रस्ते, वाहतूक या सारख्या भौतिक गोष्टिचा अभाव.

१०) स्वस्त व उच्च दर्जाची वैद्यकीय सेवेचा अभाव.

११) जणावरांवर येणाऱ्या साथींचे रोग व त्यातून दगावणारी जणावरे.

१२) पावसाची कमतरता.

**दूग्ध व्यवसायातील समस्येवर उपाय योजना -**

१) दूधाला मापदंडानूसार हमीभाव द्यावा.

२) उच्च जातीच्या व जास्त दूध देणाऱ्या गाई व म्हशाीची उपलब्धता करून द्यावी.

३) दूध संकलन करण्यासाठी आधूनिक दूध संकलन केंद्राची स्थापना करण्याची गरज आहे.

४) दूधा पासून निर्माण पदार्थांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजार पेठ उपलब्ध करून द्यावी.

५) पशू खाद्यावर रासायनिक खता प्रमाणे सबसिडी देण्यात यावी.

६) व्यवसायात आधूनिकता आणण्यासाठी चर्चा सत्रे व प्रशिक्षण देण्यात यावे.

७) जिल्हा दूध संघामध्ये सुरु असलेला सावळा गोंधळ थांबवून शेतकरी पूरक उपक्रम राबवावे.

८) दूग्ध व्यवसाय शेतीला जोड धंदा म्हणून नाही तर स्वतंत्र व्यवसाय म्हणून विकसित करावा.

९) ,वेळोवेळी जणावरांचे लशीकरण करावे जेणेकरून साथीच्या रोगापासून त्यांचा बचाव होईल.

१०) विविध योजना सुरु करुन या अंतर्गत शेतकऱ्यांना आधूनिक गोठा, पुरेशी विज, व्यवसायासंबंधी यंत्रे हे सवलतीच्या दरात पूरवावे.

११) लवकर वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी गावोगावी वैद्यकीय रुग्णालय स्थापन करावे.

१२) दूधावर अनूदान देऊन जास्त उत्पादित दूधाची खरेदी करावी.

१३) दूधापासून निर्माण वस्तू आंतरराष्ट्रीय बाजार पेठेत पोहचावी.

१४) जणावरांचे विमा काढावे.

दूध व्यवसायातील वरील कारणे व उपाय योजना बघता या व्यवसायाला स्वतंत्र व्यवसायाचे स्वरुप देवून जपले पाहिजे. कारण त्यातून मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात रोजगार निर्माती होत आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा हा व्यवसाय कणा बनला आहे. नगदी मिळकतीमुळे त्याला शेतकऱ्यांची पसंती सूध्दा मिळत आहे.परंतू त्याची जोपासणा करण्याचे दाईत्व आता शासनाने घेणे गरजेचे आहे. दूध हा आहारातील पूर्ण अन्न म्हणून ओळखला जातो. त्याचा वापर आहारात वाढणे गरजेचे आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांना पून्हा उभा करून या व्यवसायाला गत वैभव मिळणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ -**


१) बि.पी पाटील ''दूग्ध व्यवसाय दशा व दिशा''

२) डॉ. उध्दव रसाळे ''दूग्ध व्यवसाय यशाची गुरुकिल्ली''

३) डॉ.वसंत मुंढे, '' महाराष्ट्रातील दूग्ध व्यवसाय''

४) डॉ. सो.स. बूरकूल ''आर्थिक दूध व्यवसाय''

५) महाराष्ट्र शासनाचा आर्थिक पाहणी अहवाल.

६) नामांकित वर्तमानपत्रे, वेबसाईट.